## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. ५) याच्या कलम ९ नुसार, जिल्हा परिषदेत, जिल्ह्यातील निर्वाचक गटांतून प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निवडून आलेल्या परिषद सभासदांचा आणि जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांच्या सभापतींचा समावेश आहे. त्याचप्रमाणे, कलम ५७ नुसार, पंचायत समितीत, निर्वाचक गणामधून प्रत्यक्ष निवडून आलेल्या सदस्यांचा समावेश आहे.

२. सध्या, जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या कामकाजामध्ये फक्त निवडून आलेले सभासद व सदस्य सहभागी होतात. तथापि, अनेक सामाजिक कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रातील तज्ज्ञ, राज्यभरातील ग्राम विकास कामांमध्ये सक्रियपणे कार्य करत आहेत. जिल्हा परिषदांमध्ये नामनिर्देशित सभासदांचा आणि पंचायत समितीमध्ये नामनिर्देशित सदस्यांचा समावेश करण्याची मागणी करणारी अनेक निवेदने, शासनास प्राप्त झालेली आहेत. म्हणून, जिल्हा परिषदेमध्ये निवडून आलेल्या एकूण सभासद संख्येच्या दहा टक्के किंवा किमान पाच व्यक्तींना यांपैकी जे अधिक असेल ते जिल्हा परिषद सभासद म्हणून ; आणि पंचायत समितीमध्ये निवडून आलेल्या एकूण सदस्य संख्येच्या वीस टक्के किंवा किमान एक व्यक्ती यांपैकी जे अधिक असेल ते पंचायत समिती सदस्य म्हणून नामनिर्देशित करण्यासाठी तरतूद करून त्याद्वारे, जिल्हा परिषद किंवा पंचायत समिती मधील ज्ञान किंवा अनुभव असलेल्या व्यक्तींना, जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या प्रशासनामध्ये सहभागी करून घेण्याची संधी देणे आणि ग्रामीण क्षेत्राच्या विकासासाठी त्यांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा वापर करणे इष्ट आहे असे, शासनास वाटते. उक्त प्रयोजनासाठी, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मध्ये सुयोग्य सुधारणा करणे इष्ट वाटते.

३. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक १० मार्च २०२६.

**जयकुमार गोरे,**
ग्रामविकास मंत्री.

(शा.म.मु.) एचबी ३२७१–३ (१०००—३-२०२६)

**वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन.**

या विधेयकामध्ये, वैधानिक अधिकार सोपवण्यासंबंधीचे पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहेतः -

**खंड ४.—** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मध्ये कलम १०-१अ समाविष्ट करण्याचा हेतू असणाऱ्या या खंडान्वये,-

(अ) उप-खंड (२) मध्ये, सभासदांचे नामनिर्देशन करण्याची रीत विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे ;

(ब) उप-खंड (४) मध्ये, नामनिर्देशित सभासदांची नावे **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध करण्याचा अधिकार, राज्य निवडणूक आयोगाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ७.—** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मध्ये कलम ५९अ समाविष्ट करण्याचा हेतू असणाऱ्या या खंडान्वये,-

(अ) उप-खंड (२) मध्ये, सदस्यांच्या नामनिर्देशनाची रीत विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे ;

(ब) उप-खंड (४) मध्ये, नामनिर्देशित सदस्यांची नावे **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध करण्याचा अधिकार, राज्य निवडणूक आयोगाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ९.—** या खंडान्वये, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या कालावधीच्या आत अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना, कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे ती अडचण दूर करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**२.** वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे वर नमूद केलेले प्रस्ताव, हे सामान्य स्वरूपाचे आहेत.

